(७७०)

बहुउद्देशीय कर्मचारी संघटना,
निम-वैद्यकीय संवर्गांचे एकीकरण
एकीकृत संवर्गांच्या वेतनश्रेणी, इत्यादी

(1)

महाराष्ट्र शासन.
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक एमपीडब्ल्यु १०८२/५८८१(२)/सेवा-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक-१२ सप्टेंबर, १९८५.

निर्णय:- महाराष्ट्र राज्यात सर्वत्र बहुउद्देशीय कर्मचारी योजना कार्यान्वित झाली आहे व पूर्वीप्रमाणे एका विशिष्ठ आरोग्य कार्यक्रमातील एकउद्देशीय कर्मचारी म्हणून काम न करता आता, हे कर्मचारी सर्व आरोग्य कार्यक्रमाच्या कामात सहभागी झाले आहेत. जरी हे कर्मचारी आता सारखेच काम करीत असले व त्यांच्या जबाबदा-या सारख्याच असल्यातरी ते राज्य क्षेत्रातील व स्थानिक क्षेत्रातिल (जिल्हा परिषदा) आपआपल्या पूर्वीच्याच आरोग्य कार्यक्रमाच्या संवर्गात राहिले आहेत व त्यांची पदनामे पूर्वीचीच म्हणजे हिवताप संनिरिक्षण कर्मचारी, पटकी कर्मचारी, लसटोचक, अशी राहिली असून त्यांचे पदोन्नतीचे मार्गही पूर्वीप्रमाणे निराळे आहेत. म्हणून या विविध नि-वैद्यकीय संवर्गाचे एकीकरण करुन पदोन्नतीचे समान मार्ग उपलब्ध करुन देण्याविषयीचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता.

२. काळजीपूर्वक विचारांनी शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(१) संवर्गांचे एकीकरण :-

अ) राज्य क्षेत्रातील व स्थानिक क्षेत्राखालील (जिल्हा परिषदांमधील) सध्याचे विविध निम-वैद्यकीय संवर्गांचे दिनांक १ एप्रिल १९८५ पासून खाली दिलेल्या विवरण-पत्रात निर्देश केल्याप्रमाणे एकीकृत संवर्गात रुपांतरित करण्यात यावे.

स्थानिक क्षेत्र :-

| वर्तमान पदाचे पदनाम व वेतनश्रेणी १. | ज्या कार्यक्रमासाठी हे पद सध्या मंजुर झाले आहे तो कार्यक्रम २. | ज्या एकीकृत संवर्गात वर्तमान पद संवर्गात केले आहे त्याचे पदनाम. ३. | एकीकृत संवर्गाच्या पदाचे पदनाम ४. |
|---|---|---|---|
| विशेष पटकी कामगार रु. ३५०-४३५ | पटकी नियंत्रण | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी. | आरोग्य कर्मचारी. |
| लसटोचक रु. ३५०-४३५ | देवीरोग निर्मूलन/ विस्तारीत लस टोचणी | -"- | -"- |
| पटकी पर्यवेक्षक रु. ३९०-५४० | पटकी नियंत्रण | बहुउद्देशीय आरोग्य सहाय्यक. | आरोग्य सहाय्यक. |
| गट पातळी पर्यवेक्षक रु. ३९०-५४० | देवी रोग निर्मूलन/ विस्तारीत लसटोचणी | -"- | -"- |
| समन्वयक रु. ३९०-५४० | कुटुंब कल्याण | -"- | -"- |

(2)



| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| स्वच्छता निरिक्षक रु. ३३५-६८० | किमान गरजा कार्यक्रम [प्राथमिक आरोग्य पथक] | बहुउद्देशीय आरोग्य सहाय्यक | आरोग्य सहाय्यक |
| स्वच्छता निरिक्षक रु. ३३५-६८० | किमान गरजा कार्यक्रम [प्राथमिक आरोग्य केंद्र] | -"- | -"- |
| वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रु. ३२५-८०० | पटकी नियंत्रण | बहुउद्देशीय आरोग्य पर्यवेक्षक. | आरोग्य पर्यवेक्षक |
| वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रु. ३२५-८०० | देवीरोग निर्मूलन/ विस्तारीत लसटोचणी | -"- | -"- |
| **राज्यक्षेत्र :-** | | | |
| हिंवताप संनिरिक्षण कर्मचारी रु. २५०-४३५ | हिंवताप निर्मुलन | बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी | आरोग्य कर्मचारी |
| किटक समाहारक रु. २५०-४३५ | -"- | -"- | आरोग्य कर्मचारी [हिंवताप किटकशास्त्र] |
| वरीष्ठ क्षेत्र कार्यकर्ता रु. २५०-४३५ | -"- | -"- | आरोग्य कर्मचारी [हिंवताप क्षेत्र] |
| कीटक समाहारक रु. २५०-४३५ | हत्तीरोग नियंत्रण | -"- | आरोग्य कर्मचारी [हत्तीरोग क्षेत्र] |
| वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता रु. २५०-४३५ | हत्तीरोग नियंत्रण | -"- | आरोग्य कर्मचारी [हत्तीरोग क्षेत्र] |
| हिंवताप संनिरिक्षक रु. २१०-५५० | हिंवताप निर्मूलन | बहुउद्देशीय आरोग्य सहाय्यकी | आरोग्य सहायक. |
| क्षयरोग आरोग्य वीक्षक रु. २१०-५५० | क्षयरोग नियंत्रण | -"- | -"- |
| बी.सी.जी. तंत्रज्ञ रु. २१०-५५० | -"- | -"- | -"- |
| हत्तीरोग निरिक्षक रु. २१०-५५० | हत्तीरोग नियंत्रण | -"- | आरोग्य सहाय्यक [हत्तीरोग] |
| स्वच्छता निरिक्षक [मुख्यालय] रु. ३३५-६८० | प्लेग प्रतिबंधक | -"- | आरोग्य सहायक [प्लेग] |
| समन्वयक रु. २१०-५५० | कुटुंब कल्याण | -"- | आरोग्य सहायक [कुटुंबकल्याण समन्वय] |
| क्षेत्र सहाय्यक[मुख्यालय] रु. २१०-५५० | पटकी नियंत्रण | -"- | आरोग्य सहाय्यक [मुख्यालय] |
| स्वच्छता-निरिक्षक रु. ३३५-६८० | -"- | -"- | -"- |
| हिंवताप पर्यवेक्षक रु. ३६५-७६० | हिंवताप निर्मुलन | बहुउद्देशीय आरोग्य पर्यवेक्षक. | आरोग्य पर्यवेक्षक. |
| हिंवताप सहाय्यक रु. ३६५-७६० | -"- | -"- | -"- |
| प्रतिष्दी अधिकारी रु. ३२५-८०० | क्षयरोग नियंत्रण | -"- | -"- |

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|
| वरिष्ठ हत्तीरोग निरिक्षक रु. ३६५-७६० | हत्तीरोग नियंत्रण | बहुउददेशीय आरोग्य पर्यवेक्षक | आरोग्य पर्यवेक्षक [हत्तीरोग] |
| विस्तार-शिक्षक रु. ३६५-७६० | कुटूंब कल्याण[पुरुष] | -"- | आरोग्य पर्यवेक्षक [कुटूंब कल्याण पुरुष] |
| आरोग्य-शिक्षण विस्तार-अधिकारी रु. ३६५-७६० | -"- | -"- | -"- |
| वरिष्ठ सॅनिटेरियन रु. ३२५-८०० | -"- | -"- | -"- |
| वरिष्ठ आरोग्य निरिक्षक रु. ३६५-७६० | -"- | -"- | -"- |
| वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक[सहाय्यकारी परिचारीका-प्रताविका प्रशिक्षण] रु. ३२५-८०० | -"- | -"- | -"- |
| क्षेत्र पर्यवेक्षक रु. ३६५-७६० | क्षयरोग निर्मूलन विस्तारीत लसटोचणी. | -"- | आरोग्य पर्यवेक्षक |
| सहाय्यक हिंवताप अधिकारी रु. ५००-९०० | हिंवताप निर्मूलन | बहुउददेशीय अवैधकीय आरोग्य अधिकारी | अवैधकीय आरोग्य अधिकारी. |
| कीटकशास्त्रीय सहाय्यक रु. ५००-९०० | हत्तीरोग नियंत्रण | -"- | -"- |
| अणुजीवशास्त्रीय व कीटकशास्त्रीय सहाय्यक रु. ५००-९०० | प्लेग प्रतिबंधक | -"- | -"- |

ब] वर निर्देशित केल्याप्रमाणे संवर्गाचे एकीकरण राज्यक्षेत्रात व स्थानिक क्षेत्रात वेगवेगळे राहील.

क] बहुउददेशीय कर्मचारी योजनेमधील कर्मचाऱ्यांना कराव्या लागणाऱ्या विविध कर्तव्यांच्या संदर्भात जरी निम्नलिखित पदामधील कर्मचाऱ्यांची कर्तव्ये निराळी असली तरी ते सध्या आरोग्य कार्यक्रमांतर्गत संबंधी संवर्गाचे घटक आहेत त्यामुळे एकीकृत संवर्गातील समतुल्य पदांमध्ये त्यांचे विलिनीकरण करण्यात आलेले आहे.

हिंवताप निर्मूलन कार्यक्रम :- वरिष्ठ क्षेत्र कार्यकर्ता. कीटक समाहारक.

हत्तीरोग नियंत्रण :- कीटकशास्त्रीय सहाय्यक, वरिष्ठ हत्तीरोग निरिक्षक, हत्तीरोग निरिक्षक, कीटक समाहारक, वरिष्ठ क्षेत्रकार्यकर्ता.

प्लेग प्रतिबंधक संघटना :- अणुजीवशास्त्रीय व कीटक शास्त्रीय सहाय्यक, स्वच्छता निरिक्षक [मुख्यालय].

कुटूंब कल्याण कार्यक्रम :- समन्वयक
- विस्तार शिक्षक,
- आरोग्य शिक्षण विस्तार अधिकारी
- वरिष्ठ सॅनिटेरियन
- वरिष्ठ आरोग्य निरिक्षक
- वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक[साहयकारी परिचारिका-प्रताविका प्रशिक्षण]

....४/-

(5)

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९७८ नुसार, रु. ३२०-१५-४००-२० ५००-विस्तार-२०-८०० ही वेतनश्रेणी मंजूर झालेली आहे. त्या पदाच्या धारकांना ह्या संवर्गात वरची ज्येष्ठता मिळेल व त्यांची परस्पर ज्येष्ठता त्या प्रमाणे निश्चित होईल. परंतु वरिष्ठ स्वच्छता निरिक्षक यांना दि. १.१.८१ पासून सुधारीत वेतनश्रेणी मंजूर झाली असली तरी त्यांना वरची ज्येष्ठता मिळणार नाही.

ड] <u>अवैधकीय आरोग्य अधिकारी</u> - अवैधकीय आरोग्य अधिकारी या एकीकृत संवर्गात विलिन झालेल्या पदांवर पदोन्नत झालेल्या कर्मचाऱ्यांची त्या पदावर अखंडीत स्थानापन्न झालेल्या नियुक्तीची तारीख [अर्थात अनियमित बढतीचा काळ अपवर्जित करून] आणि अवैधकीय आरोग्य अधिकारी या एकीकृत संवर्गात विलिन झालेल्या पदावर सरळसेवा प्रवेशाने [नामनिर्देशनाने] ज्या तारखेस नियुक्ती झाली असेल ती तारीख प्रमाण धरण्यांत यावी.

३] <u>भावी सेवा प्रवेश</u> - आरोग्य कर्मचारी, आरोग्य सहायक, आरोग्य अधिकारी या पदांवर भावी सेवा प्रवेश खाली दिल्याप्रमाणे राहील.

अ] <u>आरोग्य कर्मचारी</u> - भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र किंवा सामान्य विज्ञान हे विषय घेवून एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण झालेल्या व बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या अठरा महिन्यांचा मूलोधोग प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेल्या उमेदवारातून या पदावर नियुक्ती करण्यांत यावी.

ब] <u>आरोग्य सहाय्यक</u> :- योग्यतेच्या आधीन राहून ज्येष्ठतेनुसार खालील आरोग्य कर्मचाऱ्यामधून हे पद पदोन्नतीने भरण्यांत यावे.

१] एस.एस.सी. उत्तीर्ण व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या अठरा महिन्यांचा मूलोधोग प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा स्वच्छता निरिक्षकाचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम किंवा समतुल्य पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला आहे असे आरोग्य कर्मचारी, किंवा.

२] एस.एस.सी उत्तीर्ण न झालेले परंतु ज्यांची आरोग्य कर्मचारी या एकीकृत संवर्गात विलिन झालेल्या एका किंवा अनेक पदांवर अखंडित किमान पांच वर्षे सेवा झाली आहे व स्वच्छता निरिक्षकाचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम किंवा समतुल्य पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला आहे असे आरोग्य कर्मचारी.

तथापि जर आरोग्य कर्मचाऱ्यांनी स्वच्छता निरिक्षकाचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम किंवा समतुल्य पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केला नसेल तर तेथे बढतीपूर्व प्रशिक्षण पाठ्यक्रम विहित करण्यात येईल तो सेवेत असताना यशस्वीरित्या पूर्ण केल्यास ते बढतीस पात्र होतील.

क] <u>आरोग्य पर्यवेक्षक</u> - ह्या पदावरील नियुक्ती खाली दर्शविल्याप्रमाणे करण्यांत यावी.

[१] योग्यतेच्या अधीन राहून ज्येष्ठतेनुसार एस.एस.सी. उत्तीर्ण व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या अठरा महिन्यांचा मूलोधोग प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा स्वच्छता निरिक्षकाचा मान्यताप्राप्त पाठ्यक्रम वा समतुल्य पाठ्यक्रम यशस्वीपणे पूर्ण केलेल्या आरोग्य सहाय्यकांच्या पदोन्नतीने किंवा

[२] संविधिक विद्यापीठाची विज्ञानशास्त्राची पदवी व बहुउद्देशीय आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी असलेला अठरा महिन्यांचा मूलोधोग प्रशिक्षण पाठ्यक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाने.

पदोन्नतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण ७५:२५ असे राहिल.

...६/--

13 JAN 1980

(6)

[३] हिंवताप निर्मूलन कार्यक्रमामधील जे विद्यमान प्रयोगशाळा तंत्रज्ञ, विज्ञान शाखाचे पदवीधर असून हिंवताप पर्यवेक्षक पदाच्या वर्तमान सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार हिंवताप पर्यवेक्षक या पदावर पदोन्नतीस पात्र आहेत. त्यांनी ह्या शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आंत यापुढे रिक्त होणाऱ्या आरोग्य पर्यवेक्षकांच्या जागांवर ह्या पदांच्या सेवा प्रवेश नियमांत त्यांच्याकरीता उपलब्ध आरोग्य पदोन्नतीच्या प्रमाणात नियुक्तीसाठी विकल्प द्यावा. अशा तऱ्हेचा विकल्प त्यांनी संचालक, आरोग्य सेवा [आरोग्य] पुणे यांजकडे कार्यालय प्रमुख/विभागप्रमुख मार्फत पाठवावा. एकदा दिलेली विकल्प अंतिम धरण्यात येईल.

[ड] अवैद्यकीय आरोग्य अधिकारी :- योग्यतेच्या आधीन राहून व ज्येष्ठतेनुसार सांविधिक विद्यापीठाचे पदवीधर कोणत्याही आरोग्य पर्यवेक्षक किंवा त्या संवर्गात विलीन झालेल्या पदावर किमान पांच वर्षे अखंडित सेवा केली असेल अशा राज्य क्षेत्रातील आरोग्य पर्यवेक्षकांमधून पदोन्नतीने ही पदे भरण्यांत येतील.

वरील पदांसाठी संविधीय सेवा प्रवेश नियम शासकीय राजपत्राद्वारे जाहीर होईपर्यंत उप परिच्छेद [४] [अ], [क] व [ड] मधील आदेश तात्पुरते समजण्यात यावेत व त्याप्रमाणे केलेल्या नियुक्त्यांचा सेवा प्रवेश नियमांच्या संदर्भात पुनर्विलोकन करण्यात यावे.

[५] एकीकृत संदर्भातील पदांच्या वेतनश्रेणी :-

बहुउद्देशीय कर्मचारी योजनेतील एकीकृत संवर्गातील पदांच्या वेतनश्रेणी दिनांक १ एप्रिल १९८५ पासून खालील प्रमाणे मंजूर करण्यांत येत आहेत :-

| पदाचे पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| अ] आरोग्य कर्मचारी | रु. २९०-१०-३९०-१५-४६५-विस्तार-१५-५४० |
| ब] आरोग्य सहाय्यक | रु. ३३५-१५-५००-१०-५८०-विस्तार-२०-६८० |
| क] आरोग्य पर्यवेक्षक | रु. ३९५-१५-५००-२०-७००-विस्तार-२०-८०० |
| ड] अवैद्यकीय आरोग्य अधिकारी | रु. ५००-२०-७००-२५-९०० |

[६] विकल्प देणे :-

[अ][१] दिनांक १.४.८५ रोजी संबंधित कर्मचाऱ्याचे, त्याने धारण करीत असलेले पद ज्या पदात विलिन झाले असेल त्या पदाकरीता परिच्छेद २[५] मध्ये नमूद केलेल्या वेतनश्रेणीमध्ये त्याचे वेतन काढले जावे. तथापि, दि. ३१.३.८५ रोजी असलेला कर्मचारी, त्या दिवशी त्याने धारण करीत असलेल्या आपल्या दाव्या वेतनश्रेणीत पुढची वेतनवाढ किंवा वेतनवाढी मिळे पर्यंत किंवा तो ते पद सोडीपर्यंत, वेतन काढण्यासाठी विकल्प देऊ किंवा त्या वेतनश्रेणी... वेतन काढणे थांबेपर्यंत, ...

[२] जर संबंधित कर्मचारी आपले पद स्थानापन्नरित्या धारण करीत असेल तर त्याला या परिच्छेदातील अनुज्ञेय विकल्प दिनांक १.४.८५ रोजी ... करीत असलेल्या पदासंबंधात आणि या पदाच्या क्रमाने ... ज्या खालच्या ... दि. १.४.८५ रोजी त्याने धारण करीत असलेल्या पदावर त्याची पदोन्नती ... अशा खालच्या पदावर त्याची ... असेल त्या पदाच्या वेतनश्रेणींच्या संबंधात, वेगवेगळे विकल्प ... दि. १.४.८५ नंतर अशा खालच्या पदावर त्याची पदोन्नती ... खालचे पद धारण केले आहे असे समजून ... दिनांकापासून देण्यात यावे.

(7)

[ब] कर्मचा-याने वरील उप परिच्छेद[अ] मध्ये नमूद केलेले विकल्प या शासन निर्णयाला जोडलेल्या नमून्यात[जोडपत्र१] त्याच्या कार्यालयप्रमुखाकडे तेजी हया शासन निर्णयाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आंत सादर करावे. तथापि,

१] जे कर्मचारी या दिवशी रजेवर किंवा परसेवेसाठी प्रतिनियुक्तीवर असतील तर त्यांनी परत आल्यावर/प्रत्यावर्तित झाल्यावर त्यांच्या पदाचा कार्यभार घेतल्यानंतर दोन महिन्याच्या आंत उक्त प्रधिकारी यांजकडे विकल्प सादर करावा.

२] एखादा कर्मचारी दि. १ एप्रिल १९८५ रोजी निलंबित असेल तर त्याने कामावर परत आल्यावर दोन महिन्याच्या आंत जर ती तारीख या उप परिच्छेदात विहित केलेल्या तारखेनंतरची असेल तर प्राधिका-याकडे विकल्प सादर करावा.

[क] परिच्छेद [६][ब] यामध्ये विहित केलेल्या कालावधीत जर विकल्पासंबंधीचे प्रतिज्ञापन आले नाही तर त्या कर्मचा-याने एकीकृत संवर्गातील पदासाठी मंजूर केलेली वेतनश्रेणी दि. १ एप्रिल १९८५ पासून निवडली आहे. असे समजण्यात येईल.

[ड] एकदा दिलेला विकल्प अंतिम धरण्यात येईल.

[७] ज्या कर्मचा-याने उप परिच्छेद [५] मध्ये एकीकृत संदर्भातील पदांसाठी दि. १ एप्रिल १९८५ पासून मंजूर केलेली वेतनश्रेणी निवडली असेल किंवा उप परिच्छेद[६][क] नुसार त्याने ती वेतनश्रेणी निवडली आहे असे समजण्यात आले आहे. अशा कर्मचा-याचे त्या वेतनश्रेणीत प्रारंभीच्या वेतनाची महाराष्ट्र नागरी सेवा [वेतन] नियम, १९८१ चे नियम १५ व नियम ११[ब] यानुसार निश्चिती करण्यात यावी.

३. आरोग्य सेवा संचालनालयाचे विभागप्रमुख व कार्यालयप्रमुख व जिल्हा परिषदाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संबंधित कर्मचा-यांकडून वेतनश्रेणीच्या संबंधात विकल्प घेण्याची व त्याप्रमाणे वेतन निश्चिती करण्याची त्वरीत कार्यवाही करावी. या शासन निर्णयाच्या संबंधात होणा-या अतिरिक्त खर्चाबाबतचे आदेश यानंतर काढण्यात येतील. तोपर्यंत बहुउद्देशीय कर्मचारी योजनेतील एकीकृत संदर्भात समाविष्ट झालेल्या कर्मचा-यांचे वेतन, एकीकरण होण्यापूर्वी त्यांनी धारण केलेल्या पदांच्या वेतनश्रेणीतच काढण्यात यावे व वेतन व भत्ते हे ज्या लेखाशीर्षाखाली पूर्वी खर्ची घालण्यात येत होते त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची घालण्यात यावेत व खर्च चालू वित्तीय वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावे.

४. ग्राम विकास विभाग यांनी स्थानिक क्षेत्रातील संवर्गाच्या संबंधीचे आदेश ताबडतोब काढावेत.

५. राज्य क्षेत्राखालील तसेच स्थानिक क्षेत्राखालील एकीकृत संवर्गातील पदांवर कर्मचा-यांची नियुक्ती करण्याविषयी आदेश ताबडतोब काढले जातील अशी खबरदारी संबंधित अधिका-यांनी घ्यावी.

६. हा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, ग्राम विकास विभाग, नियोजन विभाग व वित्त विभाग यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर८९८/इएक्स-१ १२, दि. ६ सप्टेंबर, १९८५ नुसार त्यांच्या सहमती काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ वा. श्री. पाठक ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.